


Dayadhan Publishers Group
263, Anudaya, AkolaRoad, Near Gram Panchayat Office,
Balsond,Hingoli maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

ISBN : 978-93-91097-10-3

हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक । डॉ. दिलीप बंजारा




हरित क्रांतीचे प्रणेते

# वसंतराव नाईक

डॉ. दिलीप बंजारा

हरित क्रांतीचे प्रणेते

# वसंतराव नाईक




डॉ. बंजारा दिलीप लालू

लोकप्रशासन विभाग प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

दयाधन पब्लिशर्स ग्रुप,
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

# हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक

© डॉ. बंजारा दिलीप लालू

आवृत्ती :- पहिली
प्रकाशिका
सौ. मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, ‘अनुदया’, अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.
Mob. No. 7276193979 / 9604872233
Email Id: - dayadhanpublishersgroup@gmail.com
Website: - http://www.dayadhanpublication.com
मुद्रक
श्रेया प्रिंटर्स, 263, ‘अनुदया’, अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
प्रकाशन दिनांक ०५ सप्टेंबर २०२१ (शिक्षक दिना निमित्ताने प्रकाशित)
ISBN No. 978-93-91097-10-3 (e-book)
किंमत २५/-

टीप:-

प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क डॉ. बंजारा दिलीप लालु यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

न्यायाधिकरण:- जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

आपल्या

कार्यकर्तृत्वाला

आणि

कष्टाला

प्रेमादरपूर्वक

हे शब्द धन

# अर्पण



# मनोगत

"हरित क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक' हे पुस्तक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. देशात अनेक क्षेत्रांत अनेक नेतृत्वे उदयास आली. त्या-त्या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करीत या नेतृत्वांनी नवे आदर्श समाजासमोर घालून दिले. अनेक नव्या संकल्पनांना मूर्त रूप देऊन या नेतृत्वांनी सामाजिक विकासाचा पाया घातला. अशा नेतृत्वापैकी एक, पण आपल्या निर्णयांत दुरदृष्टी ठेवून वेगळेपण जपलेले एक नेतृत्व म्हणजे वसंतराव नाईक. म्हणूनच हे व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वत:च एक आदर्श ग्रंथ आहे. अशा व्यक्तिमत्त्वावर एक समग्र माहितीचे पुस्तक लिहावे, ही इच्छा होती. ती या निमित्ताने पूर्ण झाली आहे.

वसंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना अनेक ठळक गोष्टी लक्षात येतात. त्यांची शिक्षणाबाबत असलेली जिद्द असो किंवा एखाद्या गोष्टीत अगदी पूर्णपणे झोकून देत त्यासाठी वाहून घेण्याचा स्वभाव असो, ही गुणवैशिष्ट्ये प्रत्येकाच्या मनाला भावणारी आहेत. त्यांच्या कार्यासंबंधी वाचन केल्यानंतर या व्यक्तिमत्त्वाची छाप माझ्या मनावरही पडली. म्हणूनच त्यांच्याबाबत मनात असलेली भावना पुस्तकाच्या स्वरुपात उतरवण्याचा विचार आला आणि आज तो पूर्णत्वास जात आहे.

कोणतेही सामाजिक कार्य तडीस न्यावयाचे असेल तर त्याला राजकीय पाठबळ असायला हवे. तरच प्रत्यक्ष स्वरुपात योजना अमलात येऊ शकतात. म्हणूनच की काय, वसंतरावांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकीय क्षेत्रात स्वत:ला झोकून दिले.

एवढेच नव्हे, तर त्यांच्या प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाला जनतेनेही अगदी भरभरून साथ दिली. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सामाजिक विकासाची परंपरा असलेल्या काँग्रेससारख्या पक्षात त्यांनी आपली कारकीर्द गाजवली. १९४६ मध्ये पुसदच्या नगराध्यक्षपदाची जबाबदारी आणि त्यानंतर १९५२च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत आमदार म्हणून जनतेतून झालेली निवड ही वसंतरावांच्या लोकाभिमुख विचारांची पावती ठरते. नंतरच्या काळात तत्कालीन मध्य प्रदेशचे राजस्व मंत्रिपद असो किंवा १९५७ ते १९६० या काळातील कृषिमंत्रिपदाची जबाबदारी असो, वसंतरावांनी या प्रत्येक कामात एक वेगळी छाप पाडल्याचे दिसून येते. कोणत्याही नेतृत्वात केवळ विद्वत्ता असून चालत नाही, तर त्याला समाजातील घटकांच्या अडचणींची जाणही असायला हवी. ती जाण वसंतरावांकडे होती. म्हणूनच आचार्य विनोबा भावेंच्या भूदान चळवळीत सहभाग घेऊन त्यांनी सुमारे १ लाख ३७ हजार एकर शेती भूमिहिनांना मिळवून दिली. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल तर पंचायत राज बळकट हवे, ही जाण असलेल्या स्व. वसंतरावांनी यासाठी सत्तेचे विकेंद्रिकरण करून ग्रामीण विकासाचा मार्ग मोकळा केला. अशा या दुरदृष्टी असलेल्या नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राची धुरा ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ अशी सलग ११ वर्षे सांभाळली. केवळ मुख्यमंत्री म्हणून न राहता त्यांनी कृषिविकासाचा नवा आदर्श या काळात घालून दिला. रोजगार हमी योजना असो अथवा कृषिविषयक योजना असोत स्व. वसंतरावांनी आखून दिलेल्या मार्गावर आजही महाराष्ट्र तेवढ्याच ताकदीने मार्गक्रमण करतो आहे. म्हणूनच

वसंतराव यांच्यावर एक समग्र पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मला मिळाली. आज हे पुस्तक त्याच प्रेरणेतून झालेली निर्मिती आहे.

या पुस्तकाची मांडणी करत असताना मला बंजारा समाज कर्मचारी संस्था, समस्त बंजारा सामाजिक संघटनांचीही खूप मदत झाली. पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार श्री. मोहन राठोड, पुसद येथील वसंतराव नाईक प्रतिष्ठान मानव सेवा समितीचे अध्यक्ष श्री. दीपक आसेगावकर, पुणे येथील अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. रमेश काशिदे, मुंबई येथील संविधान तज्ञ ॲड. सुरेश माने, आयएएस डॉ. संदीप राठोड, अकोला कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्यंकराव मायंदे, श्री. निलय नाईक, ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण खोरे, शिवाजी विद्यापीठाच्या निशा मुंडे-पवार, माजलगाव येथील श्री. दिगंबर राठोड अशा मान्यवरांनी विविध व्याख्यानमालेतून व्यक्त केलेले विचार माझ्या या पुस्तकासाठी प्रेरणादायी ठरले.

या पुस्तकासाठी मला सतत प्रोत्साहन देणारे के .आर. बंग (माजी प्राचार्य वैजनाथ महाविद्यालय परळी), बाबुरावजी भीमरावजी राठोड (संस्थाध्यक्ष भीमराव ची नाईक आश्रम शाळा होळी), श्रीपती सखाराम चव्हाण कार्यकारी अभियंता महा पोषण नागपूर यांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. याशिवाय माझ्या या लेखनकार्यादरम्यान कौटुंबिक जबाबदारी सांभाळून अप्रत्यक्षपणे मला मदत करणाऱ्या माझ्या कुटुंबातील आई-वडील कै. लालू फकीरा चव्हाण व सोनाबाई लालू चव्हाण...., ज्येष्ठ बंधू किसन लालु बंजारा ,रिटायर डेपो मॅनेजर, रामधन लालू चव्हाण, श्री. व्यंकटरावजी लालूप्रसादजी चव्हाण, माजी प्राचार्य भीमरावजी नाईक आश्रम शाळा होळी), जनार्धन लालुप्रसादजी बंजारा/

चव्हाण,कार्यकारी अभियंता नांदेड एम. एस. ई. बी.).... पत्नी सौ. सुमित्रा दिलीप बंजारा, मुले पृथ्वीराज चव्हाण व पियुष चव्हाण...... यांचा उल्लेखही मला येथे टाळता येणार नाही.

महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम करणाऱ्या वसंतरावजी नाईक यांच्या जीवनचरित्रावरील हे पुस्तक वाचकांना निश्चित आवडेल, अशी आशा आहे. या पुस्तकाच्या निर्मितीत ज्या कुणाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांचे पुनश्च आभार.


**डॉ. दिलीप लालूप्रसादजी बंजारा**

(सहाय्यक प्राध्यापक)

लोकप्रशासन विभाग प्रमुख,

तथा

संशोधन मार्गदर्शक

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.

१ जुलै हा दिवस हरित क्रांती दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. भारतीय लोकशाही राष्ट्रात आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्र हे राज्य संत शुरविर व समाजसुधारकांचा राज्य म्हणुन ओळखला जातो. माणवता न्याय आणि समतेसाठी झुंज देणारे महामाणव या राज्यात उदयास आले. त्यापैकीच वसंतरावजी नाईक हे एक होय. वसंतरावजी नाईक यांच्यावरील साहित्याचे वाचन केले असता त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा लिखीत स्वरुपात समाजापुढे ठेवण्याची उत्कंठा मनात निर्माण झाली. म्हणून मी वाचन केलेल्या साहित्याची मांडणी माझ्या शब्दात शब्दांकीत करुन १ जुलै या हरित क्रांती दिना निमित्त समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.

वसंतरावजी नाईक यांचा जन्म यवतमाळ जिल्हा (ता. पुसद) येथील गहुली या छोट्याश्या गावात वास्तव्य करुन राहणाऱ्या सौ. हणुबाई फुलसिंग नाईक (राठोड) यांच्या पोटी १ जुलै १९१३ रोजी झाला. त्यांचे वडिल फुलसिंग हे गावाचे प्रमुख होते म्हणुन त्यांना लोक नाईक असे म्हणत. वसंतरावजींच्या काळात वाहतुक व शिक्षणाच्या सुविधा तितक्याश्या नव्हत्या. त्यामुळे ते गावापासुन ४ ते ५ मैल अंतरावर असलेल्या पहरादेवी, उमरी या ठिकाणी पायी जावुन जिद्द व चिकाटी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण ते अमरावती व नागपुर या ठिकाणी पूर्ण केले. शहरात वास्तव्य करुन राहत असल्यामुळे शहरीकरणाच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर पडत गेला.

वाचन करण्याची आवड ही अगदी सुरवातीपासून असल्याने ती आवड महाविद्यालयीन जिवनात वाडतच गेली. ते महाविद्यालयीन जिवनात महात्मा फुले या सारख्या समाजसुधारकांच्या पुस्तकांची वाचन केल्यामुळे त्यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्या मनोपटलावर मोठ्या स्वरुपात पडत गेला. आणि समाजाचे आपले काहीतरी घेणे- देणे आहे. ही भावणा मनात हाळुहाळू रुजू लागली. त्यांनी नागपूर येथील मॉरेशिश कॉलेज मधुन पदविचे शिक्षण पूर्ण केले. त्या महाविद्यालयात अनेक जाती धर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निरसण करण्याचे काम ते करीत असत. ते नेहमी सामाजिक चळवळीत राहत असल्याने त्यांची समाजात एका विशिष्ट प्रकारची प्रतिमा बनली. पुढे चालुन एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर वकील व्यवसाय सुरू केला. यात त्यांनी गोर गरीब आणि दुबळया लोकांची कामे अगदी जोमाने करीत असत. वकील व्यवसाय करीत असताना त्यांनी अचानक त्यांच्या पाठीमागे राजकारणाचा वारसा नसून सुध्दा ते राजकारणात उतरले आणि पूसद येथील नगर पालिकेच्या माध्यमातून आपले पहिले राजकीय पाऊल ठेवले. आणि त्यांची नगराध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. तेथून पुढे खऱ्या अर्थाने त्यांच्या राजकारणाची कारकीर्द सुरू झाली. कांही काळापर्यंत ते मध्यप्रदेशाच्या मंत्रीमंडळातही आपली राजकीय कारकीर्द दाखवून दिली. नंतर १ मे १९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. कांही वर्षानंतर ते देशाचे गृहमंत्री बनले

असता. राज्याच्या मुख्यमंत्री पदाची धुरा कन्नमवार यांच्या हाती देण्यात आली. परंतू दुर्दैवाने कन्नमवारांचे निधन झाले आणि नंतर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान वसंतरावजी नाईक यांना मिळाला.

यशवंतरावांच्या पश्चात कन्नममवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वीकारणे हे तेंव्हाच्या प्रस्थापित परंपरेचा भाग असला तरी कन्नमवारांपाठोपाठ वसंतराव नाईकांनी त्या पदावर येणे हा परंपरेचा वा साध्या योगायोगाचा प्रकार नव्हता. आरंभी राजकीय वाटलेली पण पुढे यशस्वी झालेली ती यशवंतरावांची योजना होती. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर पतंप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी यशवतंतरावांना देशाचे संरक्षणमंत्रीपद देऊ केले. त्यावेळी दादासाहेब कन्नमवार हे राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदावर होते. विदर्भ राज्याची मागणी मागे टाकून आपल्या पन्नासावर आमदार-सहकाऱ्यांसह विदर्भाचे महाराष्ट्रात विलिनीकरण करायला ते तयार झाले होते. शिवाय ते एक जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांच्यानंतर राज्याचे मुख्यमंत्रीपद चालून यायला वसंतरावांच्याजवळ यातले काहीएक नव्हते.

१९५६ मध्ये स्थापना झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याच्या यशवंतराव मंत्रिमंडळात त्यांनी कृषि, सहकार व महसुल मंत्री म्हणून काम केले होते. त्यांच्या मागे स्वातंत्र्यसंग्रामाचे लखलखीत वलय नव्हते. अनुयायी म्हणविणाऱ्या लोकप्रतिनिधींचा वर्ग नव्हता. राज्यातील कोणतीही मोठी जात संघटित स्वरूपात त्यांच्यासोबत नव्हती. ते ज्या बंजारा समाजातूप आले होते तो भटक्या व

विमुक्तांचा वर्ग संख्येने लहान, अशिक्षित व मागासलेला म्हणून ओळखला जाणारा होता. अशा वर्गातून आलेले एक यशस्वी वकील, स्वच्छ चारित्र्याचे, हंसतमुख लोकप्रतिनिधी आणि प्रशासनावर आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविणारे मंत्री एवढीच त्यांची ओळख होती. यशवंतरावांसारखे ते लोकनेते नव्हते आणि कन्नमवारांसारखी लोकप्रियता त्यांच्याजवळ नव्हती... तरीही त्यांना राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर आणणे हा यशवंतरावांच्या राजकीय दूरदृष्टीचा व चाणाक्ष नेतृत्वाचा निर्णय होता.

यशवंतरावांनंतर राज्याच्या मुख्यमंत्रीपदाव यायला प. महाराष्ट्रातील मराठा नेत्यांचा एक वर्ग तेंव्हाही सज्ज होता. बाळासाहेब देसाई हे त्यात अग्रेसर होते. यशवंतरावांसारखेच सातारा जिल्ह्यातून आलेले बाळासाहेब त्यांच्याहुन वयाने वडील होते. राजकारणातील ज्येष्ठता, स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग आणि सोबत असलेल्या मराठा समाजाची संघटित ताकद या बळावर राज्याचे मुख्यमंत्रीपद आपल्याकडे येईल ही त्यांची समजूत योग्य म्हणावी अशीही होती. (संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्यावेळी 'हे मराठी राज्य की मराठा राज्य' असा अग्रलेख लिहुन ग.त्र्यं. माडखोलकरांनी या राज्यावरील मराठा वर्चस्वाची जाणीव तेंव्हा साऱ्यांना करूनही दिली होती.) तसे बाळसाहेब तेंव्हा व नंतरही मुख्यमंत्र्याच्या थाटात असत व तसेच बोलत.

वसंतराव नाईक या मराठी व मराठा राजकारणाला तोवर बऱ्यापैकी अपरिचित असलेल्या नेत्याची महराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी या पार्श्वभूमीवर झालेली निवड हीच

त्यांच्यासमोर असणारी राजकीय व प्रादेशिक आव्हाने स्पष्ट करणारी बाब होती. त्यांच्या पदोन्नतीमुळे खट्टू व रुष्ट झालेले मराठा नेतृत्व आपलेसे करणे आणि स्वतःचे वैदर्भी व मागासवर्गीय असणे महाराष्ट्राच्या गळी गोड करून उतरविणे हा त्यांच्यासमोरचा प्राथमिक प्रश्न होता. कन्नमवारांपाठोपाठ विदर्भातून आलेल्या नाईकांना मुख्यमंत्रीपद देण्याचा यशवंतरावांचा निर्णय मराठा समाजाचा रोष त्यांच्यावर ओढवणाराही होतीच. यशवंतरावांना स्वजातीय नेत्यांचा भरवसा नाही आणि आपल्यामागे ती माणसे आपले राजकारण चालवतील असा विश्वास त्यांना वाटत नाही अशी टीका त्या काळात त्यांच्यावर झाली हेही येथे लक्षात घ्यायचे. मात्र तेंव्हाची काँग्रेस संघटना आजच्याहुन अधिक सघन व नेतृत्निष्ठ असल्याने आणि तीत यशवंतरावांचा शब्द बऱ्याच अंशी प्रमाण असल्याने वसंतरावांना या अडचणींवर मात करणे जसे शक्य झाले तसा त्यांच्या त्या महाराष्ट्रविजयात त्यांच्या स्वभावातील खुल्या वृत्तीचा, आर्जवी व मृदु वागणुकीचा आणि हंसतुखाने कोणालाही आपलेसे करुन घेण्याच्या हातोटीचाही वाटा मोठा होता. लोकनायक बापूजी अण्यांपासून यशवंतरावांपर्यंतच्या सगळ्या थोरामोठ्यांनी वसंतरावाचे शली व सुसंस्कृतपणा यांचा गौरव करताना त्यांना ‘अवघड स्थितीतही आपले सत्प्रवृत्त मन जपणारा नेता’ असे म्हटले आहे. त्यांचा गौरव करताना अत्रे आणि मृणाल गोरे यासारख्श विरोधकांनीही हातचे फारसे राखलेले दिसले नाही. जुन्या मध्यप्रांत व वऱ्हाडच्या विधिमंडळातील लोकप्रतिनिधी व उपमंत्री या नात्याने प्रशासनाशी त्यांची

असलेली ओळख जुनी व पक्की होती. शिवाय ते कामालाही वाघ होते. तब्बल ११ वर्षे वसंतराव महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर होते आणि तो सारा काळ आजच्या भाषेत २४X७ असे काम करीतच त्यांची घालवीला.

वसंतरावांकडे राज्यांचे मुखमंत्रीप सोपविण्यामागे तोवर विझलेली वेगळ्या विदर्भ राज्याची चळवळ हेही एक कारण अर्थातच होते. लोकनाय बापूजी अणे, जांबुवंतराव धोटे आणि त्र्यं.गो, देशमुख हे त्या चळवळीचे तीन प्रमुख नेत यवतमाळ या वसंतरावांच्य जिल्ह्यातून आले असणेही बाबही त्या निवडीला कारण ठरणारी होती. राज्य पुनर्रचना आयागोने मान्य केलेली विदर्भ राज्याची मागणी त्या प्रदेशाल विसरायला लावण्याचे एक गणितही त्या निवडीमागे होते. वसंतरावांच्यामागे राजकीय कार्यकर्त्यांचा कोणताही गट व वर्ग नसल्याने त्यांचे मुख्यंमंत्रीपद आपल्याला डोईजड होणार नाही असाही पश्चिम महाराष्ट्रातील कर्त्यां नेत्यांचा एक कयास असावा... बवंतरावांचे मुख्यमंत्रीपद या सगळ्या कसोट्यांवर उतरले. एक गोष्ट मात्र खरी, आपल्याकडुन असलेल्या महाराष्ट्राच्यावजनदार नेत्यांच्या अपेक्षा जपताना वसंतरावांनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचे वेगवळेपण आणि त्याची स्वतंत्र छाप याही गोष्टी कायम राखल्या, कोणत्याही महत्वाच्या निर्णयासाठी ते याशवंतरावांच्या किंवा दिल्लीकरांच्या संमतीसाठी थांबले आहेत असे त्यांच्य कारकीर्दीत कधी दिसले नाही. तोंडातला पाईप जेढ्या सहजपणे शिलगवाव तेवढ्या सहजपणे ते त्यांच्यापुढचे जटील प्रश्न सोडविताना राज्याला दिसले. त्या प्रश्नांच्या

ओझ्यांनी ते वाकल्याचे वा त्यांच्या अवघडपणामुळे त्यांची स्वच्छ दृष्टी झाकोळल्याचे कधी दिसले नाही.

कोयनेचाभूकंप व सत्तरच्या दशकातील अभूतपूर्व दुष्काळासारखी काही नैसर्गिक तर काही मानवनिर्मीत. या काळात वसंतरावांनी राज्याल जे धीरोदात्त नेतृत्व दिले आणि राजकीय व प्रशासकिय व्यवहारच नव्हे तर जनेतेचे मनही आपण जाणतो याची जी ओळख महाराष्ट्राला पटली ती जनमानसातीाल त्यांच्याविषयीचा आदर व विश्वास उंचावणारी होती. ती अशी की, या काळात महाराष्ट्रावर अनेक मोठी संकटे आली. सन १९६७ साली सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रभावी प्रचारासाठी महाराष्ट्रात दौरा केला. या निवडणूकीत विधानसभेवर पूसद मतदारसंघातून चौथ्यांदा निवड होऊन दि. ०६.०३.१९६७ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर दुसऱ्यांदा वसंतराव नाईक यांची एकमताने निवड झाली. कृषी क्षेत्राविषयी अतिशय आवड असल्यामुळे नाईक यांच्या प्रयत्नांमुळे १५ लाख टन धान्य अधिक उत्पादन वाढले. त्यातुन १९.०४.१९६९ साली पंजाबराव कृषी महाविद्यालयाची स्थापना करून शेतकी व्यवसायात भर टाकण्यात मदत केली. १० मे १९६८ रोजी गुन्हेगारांना मुक्त जगता यावे यासाठी पहिले खुले कारागृह पैठण येथे स्थापन केले व गुन्हेगारांना माणूस म्हणून जगण्यास मार्ग दाखविला. सन १९७० साली शहरी जीवनात वाढ व्हावी. गोरगरीब मध्यम वर्गीयांना शहरात नोकरी करता यावी म्हणून शासनातर्फे लोकांच्या मदतीला हातभार म्हणून १८ मार्च रोजी सिडकोची स्थापना केली. त्यातून लोकांना निवारा

मिळाला. शैक्षणिक सुविधा करून दिल्या, याचवर्षी अमेरीकेच्या निमंत्रणावरून अमेरीकेचा दौरा व युरोपीय देशांना त्यांनी भेटी दिल्या. सन १९७२ साली पुन्हा सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रचारासाठी राज्यभर दौरा करून पूसद मतदार संघातून वसंतराव नाईक यांची पाचव्यांदा निवड होऊन दि. १४.०३.१९७२ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी तिसऱ्यांदा निवड झाली. १९७२-७३ साली राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली. लोकांचे भुकेने बेहाल, जनावरांचा चारा यासारख्या गंभीर प्रकारच्या समस्या नाईक यांच्यासमोर आ वासून उभ्या होत्या. मात्र त्या अडचणीवर त्यांनी मात करून विविध कामे सुरू केली. मुजुमदार लोकांना सुगडी खाण्यास देवू केले. विविध योजना राबवून जनतेला दिलासा दिला. राज्यातील नऊ जिल्ह्यात दुष्काळ हा देशातील इतर कोणत्याही भागातील दुष्काळापेक्षा अधिक तिव्र स्वरूपाचा होता. त्यावेळी त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात फिरून दुष्काळी कामाला मोठ्या प्रमाणावर चालना दिली. दि. २०.०२.१९७५ साली वसंतराव नाईक यांनी राजीनामा दिला.कोयनेच्या भूकंपाआधी राज्याच्या राजकारणातही एक भूकंप झाला होता. बाळासाहेब देसायांनी आपल्या गृहमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पाटाणचा रस्ता धरला होता. मुंबईतील गिरणी कामगारांच्या एक मोर्च्याने हिंसक वळण घेतले तेंव्हा त्यांच्या बंदोबस्तासाठी गोळीबाराचा आदेश द्यायला बाळासाहेबांनी नकार दिला होता. त्यामुळे संतापलेल्या मुंबई काँग्रेसने त्यांच्या विषयीची नापसंती दर्शविणारा ठराव केला तर होमी तल्यारखान आणि कैलास

या मंत्र्यांनी त्यांच्यासाठी त्यांचे राजीनो मुख्यमंत्री वसंतराव नाईकांकडे सोपविले. त्या प्रकारात तडजोड करण्यासाठी वसंतरवानी स.का. पाटील या तेंव्हाच्या मुंबईच्या वजनदार नेत्याची मध्यस्थी वापरली. व त्या दोन मंत्र्यांना त्यांचे राजीनामे मागे घ्यायला लावले. दुसरीकडे बाळासाहेबांचे मन वळवून त्यांना गृहखात्याऐवजी महसूल खाते घ्यायला राजी केले. हा सारा खटाटोप त्यांना नसलेल्या राजकीय अनुभवाची परिक्षा घेणारा आणि तीत पास करणारा होता. बाळासाहेबांना देऊ केलेले आणि त्यांना आरंभी न आवडलेले महसूल मंत्रीपद असतानाचा कोयनेचा भीषण भूकंप झाला. महसूलमंत्री म्हणुन वाट्याला आलेले सगळे अधिकार वापरून बाळासाहेबांनी भूकंपग्रस्तासांठी जे काम केले ते अलौकीक म्हणावे असे होते. साऱ्या जगातून भूकंपपिडितांसाठी त्यांनी मदत आणली आणि त्यात घरे गमवावी लागलेल्या लोकांसाठी सत्तर हजार घेर बांधूनच ते मुंबईत परत आले. त्या संबंध काळात वसंतराव बाळासाहेबांच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहिले व त्यांच्या सगळ्या कामात त्यांना पडेल ती मदत करायला सदैव सज्जही राहिले. (या काळात बाळसाहेबांनी सरकारकडे १ हजार घोंगड्या पाठवा म्हणुन केलेली तार '१ हजार कोंबड्या पाठवा' म्हणून मुंबईत अवतरली. तेंव्हाच्या शहाण्या प्रशासनाने तिची शहानिशा न करता तेवढ्या कोंबड्या पाठविल्याही. खराप्रकार लक्षात आल्यानंतर मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी संबंधीतांची जी जबर कानउघाडणी

केली तो प्रसंग त्या भीषण आपत्तीतही साऱ्यांना हसायला लावणारा ठरला.)

सेनापती बापटांनी त्याच काळात मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानासमोर सीमाप्रश्नावर आपले बेमुदत उपोषण मांडले. सेनापतींना सारा महाराष्ट्र भीष्माचार्य म्हणून शिरावर घेणारा होता. स्वाभाविकच सारे राजकारण त्यांच्या उपोषणाने ढवळून निघाले. सेनापतींचा निग्रह आणि राज्य सकरारचा नाइलाज यातून मार्ग कसा निघतो या चिंतेने साऱ्यांना ग्राले असतानाच वसंतरावानी सेनापतींची त्यांच्या उपोषणात मंडपात जाऊनच भेट घेतली. ते ज्या प्रश्नासाठी लढत आहेत त्यासाठी केंद्रकाकडे स्वतः मध्यस्थी करण्याची त्यांनी तयार दाखविली. वसंतरावांच्या आर्जवतील प्रामाणिकपणाने सेनापतीच विरघळले. त्यांनी उपोषण तर सोडलेच आणि तेवढ्यावर न थांबता मुख्यमंत्र्यांच्या निमंत्रणाचा स्विकार करुन त्यांचे एक दिवसांचे आतिथ्यही 'वर्षा' वर जाऊन त्यांनी अनुभवले. आचार्य अत्रे ही त्याही काळात महाराष्ट्र सरकारला भेडसावणारी प्रतिभ शक्ती होती. सरकारवर घणाघती प्रकार करण्याचे त्यांचक काम तेंव्हाही सुरू होती. त्यांच्या वाराची धार कमी करायला वसंतरावानी त्यांना आपल्याकडे जेवायला यायचे आमंत्रण दिले. जेवणातली आचार्यांसमोरचे ताट आणि वाटी वेगवळी व चांदीची होती. आयार्चांने त्याचे कारण विचारले तेंव्हा 'हे ताट वस्तलाबाईंनी त्यांच्या भावासाठी घेतले होते' असा खुलासा वसंतरावानी केला. वस्तलाबाईंचे भाऊ तेंव्हा दिवंगत झाले होते. वस्तलाबाईंनी आपल्या भावाच्या जागी आपली

स्थापना केल्याचा गहिवर मग आचार्यांनाच आवरता आला नाही.

मृणाल गो-यांच्य नेतृत्वात त्याचा काळात निघालेल्या एक लाटणे मोर्चाने मुख्यमंत्र्याचीं गाडी रस्त्यात अडवली. त्यातील एक मोर्चेकरणी त्य गाडीच्या बॉनेटवर चढून बसली व तिने गाडीवरील तिरंगी झेंडयांचा स्तंभच त्य झेंड्यासह उपटून हातात घेतला. आपल्या कार्यकर्तीने केलेली चुक मृणालताईंनी नंतर दुरूस्त केली. तो झेंडा त्याच्या स्तंभासह घेऊनच त्या मुख्यमंत्र्यांना त्यांच्या दालनात भेटायला गेल्या. त्यांच्याच शब्दात सांगायते तर, त्यांनी हातात दिलेल्या राष्ट्रध्वज वसंतरावांनी ज्या आदबीने स्वीकारला ती त्यांच्या विनम्रतेएवढीच त्यांच्या मनातील राष्ट्रभक्तीची खूणगाठ पटवून देणारी होती. जांबुतराव धोटे हे वसंतरावांसारखेच यवतमाळचे. विदर्भवादी आणि वसंतरावचे नको तसे घोर टीकाकर. त्यांनी वसंतरावांवर मोर्चे नेले, त्यांच्या गाड्या अडविल्या, सभा मोडल्या आणि ते सर्दव अस्वस्थ राहतील असेच आपले राजकारण आखले. या जांबुवंतरावाचीं आई रुग्णावस्थेत मुंबईच्या इस्पितळात दाखल असताना तिला भेटायला प्रत्यक्ष मुख्यमंत्रीच एकदा तेथे हजर झाले. त्या घटनेने जांबुवंतरवांनाही वसंतरावा समजले व त्यांचा त्यांना असलेला विरोध मग पूर्वीएवढा टोकाचा व धारदार राहीला नाही.

वसंतरावांनी केवळ अनुनयाचेच राजकारण केले नाही. कोणत्याही चांगल्या भटकया विमुक्ताचा असतो तसा त्यांचा कणा राजकारणात ताठ होत आणि त्यांची मानही

त्यात झुकलेली कधी कोणाला दिसली नाही. स्वतः शेतकरी असलेल्या वसंतरवांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणण्याचा ध्यास घेतला. तो घेताना 'एक वर्षात राज्याच्या अन्नधान्याच्या क्षेत्राला अनुशेष संपलिा नाही तर मला फासावर चढवा' अशी घोषणाच त्यांनी पुण्याच्या जाहीर सभेत केली. लोकशाहीतल्या राज्यर्त्याने तसे आततायीपण करून नये हा यशवंतरावांचा सल्लाही त्यावेळी त्यांना मनावर घेतला नाही. त्या वर्षात व नंतरच्या काळात महाराष्ट्रात शेती व सिंचनाच्या क्षेत्रात त्यांनी जे अतोनात परिश्रम घेतले त्याचा परिणाम हे राज्य सुजलाम सुफलाम होण्यात झालेलाच मग देशाला व जगाला दिसला. कधी नव्हे तेवढा जीवघेणा दुष्काळ १९७१ च्या सुमारास महाराष्ट्रात पडला. ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांएवढीच घरंदाज माणसेही रस्त्यावर आलेली तेंव्हा दिसली. त्या  संकटात न डगमगता सगळ्या पक्षांना सोबत घेऊन वसंतरावांनी रोजगार हमी योजनेची महत्वाकांक्षी मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. लाखोंना रोजगा मिळवून दिला आणि कोट्यावधींना जगण्याचे बळ प्राप्त करुन दिले. रोजगार हमी ही त्यांची येजना नंतर साऱ्या देशने स्वीकारली. आताची महात्मा गांधी रोजगार हमी योजना (नरेगा) ही तिचीच विस्तारित व राष्ट्रीय आवृत्ती आहे.

यशवंतरावांनी चालना दिलेल्या सहकाराच्या चळवळीला वसंतरावांनी पुढी ११ वर्षे बळ दिले. महाराष्ट्राचे ऊस उत्पादन वाएले. त्यातून साखरेचे शंभराव कारखाने उभे राहिले. द्राक्षाच्या शेतीला प्रोत्साहन देण्याचे कामी त्यांचेच.

द्राक्षांची निर्मिती व आजचे वायनरीचे उद्यो त्यातून आले. दुधाचे उत्पन्न वाढावे, शेतकऱ्यांना उत्पन्नाची जास्तीची साधने उपलब्ध व्हावी या प्रयत्नांचा चालना देण्याचे कामही त्यांचे. विदर्भातील कापूस उत्पादकांसाठी सुरू झालेली कापूस ते कापड ही एकाधिकार खरेदी योजना त्यांच्याच कारकीर्दीतील. तिने शेतकऱ्याना सावकारांच्या तावडीतून सोडवण्याचे क्रांतीकारी कार्य आरंभी केले. वसंतरावांच्या धोरणानुसार ती तशीच पुढे चालू राहिली असती तर राज्यातला कापूस उत्पादक शेतकरी एक दिवस कापडाचा उत्पादकही झाला असता. या साऱ्या कामातून वसंतराव यवतमाळ वा विदर्भाचे प्रतिनिधी न राहता महराष्ट्राच्या ग्रामीण जनतेचे विश्वसनीय नेते बनले. बळवंतराय मेहता समितीने देशात सत्तेच्या विक्रेद्रीकरणाची योजना आनली आणि १९६२ मध्ये तिचा भव्य प्रयोग महाराष्ट्रात सुरु झाला. नंतरची बारा वर्षे त्या योजनेची पायाभरणी भक्कम करण्यात व पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या कामाला आजचे वळण देण्यात त्यांचा वाटा मोलाचा होता. महाराष्ट्राच्या ग्रामीण कार्यकर्त्यांशी याच कामातून त्यांचे संबंध दृढ झाले व खेड्यांना त्यांचा विश्वासाचा साथी मिळाला.

वसंतरावांच्या जीवनाला एक देखणी सांस्कृतिक बाजूही होती. ते चांगले व चोखंदळ वाचक होते. उत्तमोत्तम मराठी व इंग्रजी ग्रंथाचा त्यांचासंग्रह मोठा होता. त्यांच्या भाषणात त्या ग्रंथाचे दाखले येत. महाराष्ट्र्च्या सांस्कृतिक क्षेत्राशीही त्यांनी जवळचा संबंध ठेवला होता. १९७३ मध्ये

यवतमाळात ४९ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन भरले होते. वसंतरावांचे पुतणे सुधाकरराव त्याचे स्वागताध्यक्ष, ते स्वतः प्रमुख पाहुणे, यशवंतराव उद्घाटक तर ग.दि. माडगुळकर हे अध्यक्ष होते. 'ग्रामीण महाराष्ट्राचे व त्याच्या व्यथा वेदनांचे चित्र मराठी सारस्वतांना त्यांनी केलेले कळकळीचे आवाहन आजही अनेकांच्या स्मरणात राहिले आहे. तेंव्हाची ही आठवण मंत्री आणि पदाधिकारी तेंव्हा आजच्या एवढे तोत्यात राहात नसत आणि सामान्या माणसांपासून त्यांना तोडणारी सुरक्षा व्यवस्थाही त्या काळात आजच्या एवढी भक्कम नसे. संमेलनाचे उद्घाटन आटोपले होते आणि मंडपासमोरच्या चौकता एका बाजूला उभे राहुन संमेलनाध्यक्ष, उद्घाटक आणि प्रमुख पाहुणे उभ्या उभ्याच गप्पा करीत रेंगाळले होते, पोलिस व्यवस्था दुर होती, संमेलनाला आलेली माणसे पुढाऱ्यापर्यंत सहन जात येत हाती. वसंतरावानी त्यांचा तो प्रसिध्द पाईप पेटवायला घेतला आणि कोणाच्या काही लक्षात येण्याआधी डोक्यावर गाठोडे घेतलेला एक ग्रामीण माणूस लगबगीने त्यांच्यापर्यंत पोहचला. त्याने मुख्यमंत्र्यांना काय मागावे? तो म्हणाला, 'जरा माचिस दे की बाबा'. 'नाही बाबा.' तो भाबडेपणाने म्हणाला. 'वसंतराव नाईक, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री'. पत्रकाराने त्याला सांगीतले. 'बापरे, म्हणजे त्या फुलसिंग नाईकांचा लेक?' तो तेवढयाच सहजपणे उद्गारला आणि चालू लागला. तेंव्हाचे नेते जनतेच्या केवढे जवळ होते त्याचा हा साक्षात्कार.

वसंतरावांच्य व्यक्तिमत्वातले साधे माणूसपण असे अनेक प्रसंगांनी प्रगट व्हायचे. कधीकधी ते त्यांच्या

नेतेपदाविरुध्दही गेलेले दिसायचे. विधिमंडळाचे अधिवेशन संपले की, चंद्रपुरजवळच्या ताडोबा या अभयारण्यात येऊन विश्रांतीसाठी काही काळ काढायचा हा त्यांचा नेम होता. मुंबईहुन चंद्रपूरला विमानाने आले की विमानतळावरून एका खुल्या गाडीत सुन ते थेट ताडोबाला पोहचायचे. वत्सलाबाई सोबत असायच्या. शिवाय काही निकटचे सहकारीही. अशा एका ताडोबा भेटीत त्यांच्यासोबत तेंव्हाचे वनमंत्री व चंद्रपुरचे पालकमंत्री दादासाहेब देवतळे हेही होते. ताडोबाला पोहच असताना वाटेतच त्यांना एक चांगला मोठा ढाण्या वाघ त्यांचा रस्ता उडवून उभा असलेला दिसता. वसंतराव तातिवंत शिकारी होते. त्यांना राहवले नसावे. जवळची बंदुक उचलून त्यांनी नेम साधला आणि एकाच गोळीत त्या वाघाला त्यांनी आडवे केले. काही दिवसांआधी औरंगाबादच्या विमानतळावर त्यांना घेऊन येणारे हेलिकॉप्टर जमीनीवर आडवे झाल्याने त्यांचा एक हात प्लास्टरमध्ये बांधला होता व निकामीही होता. त्याही स्थितीत एका हातात धरलेली बंदुक अचूक चालविण्याचे त्यांचे कसब देवतळयांनाही चांगले जाणवले होते. त्या रात्री पत्रकारांसोबत बोलताना स्वतः देवतळयांनीच मुख्यमंत्र्यांच्या शिकारीबाबत व त्यांच्या एकहाती वाघ मारण्याची किमय खुलवून सांगीतली आणि पत्रकारांनी, त्यात मीही होतो, ती सारी शिकारकथा तीत जमेल तेवढे रंग भरून आपापल्या वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर छापून आणली.

दुसरे दिवशी सगळ्या पत्रकारांच्या घरचे फोन खणखणले. आम्हा सगळ्यांन मुख्यमंत्र्यानी त्यांच्या कोळसा मुक्कामी याचे निमंत्रण दिले होते. ठरल्यावेळी सरकारी

गाड्यांतून आम्ही वनविभागाच्या तिथल्या विश्रामभवनात पोहचलो तेंव्हा स्वतः मुख्यमंत्रीच आमची वाट पाहत व्हरांड्यातल्या खुर्चीवर पाईप ओढत असलेले दिसले. आगत-स्वागत आणि चहा बिस्कीटे झाली. जरा वेळाने आमच्यातले एक जेष्ठ पत्रकार म्हणाले, 'काल तुम्ही केलेल्या वाघाच्या शिकारीबद्दल आम्हाला तुमचे अभिनंदन.'

त्याचे वाक्य अर्ध्यावर तोडत मुख्यमंत्री गरजले, 'वाघाची शिकार? कोणी केली? कोठे झाली? आता अवाक् व्हायची पाळी आमची होती. मुख्यमंत्री म्हणाले, 'अरे या राज्यात वाघाच्या शिकरीवर बंदी आहे ना?' 'होय' आमच्यातला एकजण म्हणाला. 'मग वाघाची शिकार येथे होईलच कशी?' मुख्यमंत्री म्हणाले. 'पण सर, आमच्यातला एकजन. तुमच्या शिकारीची माहिती खुद्द वनमंत्र्यांनीच' त्याला अडवीत मुख्यंमंत्री म्हणाले, 'अरे तो तुचा वनमंत्री उद्या काहीही सांगले, पण तुम्ही कायदाबियदा काही पाहायचा की नाही?' 'पण सर.' 'पण नाही आणि बिण नाही, कायद्याने वाघाच्या शिकारीवर बंदी असल्याने ती झाली नाही आणि होऊही शकत नाही हे तुम्हा पत्रकारांनाही कळू नये काय?' आम्ही समजायचे ते समजलो. जरा वेळ गेल्यानंतर 'आमची चुक' कबुल करून आम्ही हसतच वसंतरावांच्या निरोप घेतला. त्यांच्याही चर्चेवर स्मिताची जाणती रेषा होती. पुढे ही शिकार विधानसभेत गाजली. वसंतरावांनी त्यांची चूक मान्य करताना आपण शिकारी असल्याचे आपले भान कधी जातच नसल्याने व तुम्ही द्याल ती शिक्षा आपल्याला मान्य असल्याचे डोळ्यात अश्रु आणून

सभागृहाला सांगितले. त्यांचे प्राजळपण लक्षात घेतलेल्या तेंव्हाच्या समंजस सभागृहाने त्या प्रकरणावर मग पडदाही टाकला.

हा सारा काळ वसंतरावांचे व्यक्तित्व नेतृत्व चौरस आणि प्रगल्भ करणारा होता. त्यांच्यात पुर्वीच असलेला गोडवा वाढविणाराही होता. सुदैवाने त्या काळात राजकारणातले वैर आजच्या एवढे विषारी नव्हते आणि हेत्वारोप करण्याचा आजचा सवंग प्रकारही त्या काळी नव्हता. टीका भूमिकेवर व्हायची आणि भूमिकांवर आक्षेप घेण्यात दुष्टावा असण्याचेही कारण नसायचे. राजकारणातली माणसे परस्परविरोधी पक्षात असतानाही एकमेकांना सांभाळून घ्यायची. व्यक्तिगत अडचणी राजकारणात कधी आणायची नाहीत. प्रांजळपणाऐवढेच उदारपण खाजगी व्यथावेदनांबाबतही असायचे. अवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांना व्यथित करणारे अनेक प्रसंग त्यांच्य वाट्याला आले. एका पहाटे त्यांच्या तरूण मुलीचा मृतदेह मुंबईच्या प्लॅटफॉर्मशेजारी पडलेला लोकांना आढळला पण ती घटना मुख्यमंत्र्यांची कोंडी करण्यासाठी कोणी वापरली नाही. एका दुःखी बापाची व्यथा म्हणूनच सा-यांना तिच्याकडे पाहिले. त्या घटनेत कांही विपरीत असल्यास त्याची चौकशी करण्याची मागणी करूनच सारे थांबले. त्य घटनेने वसंतराव मात्र फार खोलवर दुखावले गेले. वत्सलाबाई त्यांच्याहुन जास्तीच्या खचल्या. नंतरच्या काळात वसंतरावानी त्यांना कधी एकटे राहु दिले नाही. आपल्या

प्रत्येक शासकिय दौऱ्यात, कार्यक्रमात आणि प्रवासात त्यांना सोबत घेण्याचे पथ्य वसंतरावांनी अखेरपर्यंत सांभाळले.

पक्षीय राजकारणात त्यांनी भाग घेतला. पण पक्षीय वैरांपासून ते सदैव दूर राहिले. रा. स्व. संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरूजी यांची त्यांच्या अखेरच्या आजारात वसंतरावांनी भेट घेतली व ती घेताना आपले राजकारण बाजूला ठेवण्याचे पथ्य त्यांना पाळता आले. आपल्या जवळच्या माणसांना काय आवडेल, ते कशामुळे आनंदी होतील याचे भान त्यांना असे. प्रिन्स आगाखान भारतात आले आणि मुंबईच्या त्यांच्या मुक्कामात मुख्यमंत्र्यांनी ताज हॉटेलच्या प्रिन्सेस रूममध्ये त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. तिला हजर राहायला खोजा समाजातील आपले मित्र डॉ. हिराणी यांना त्यांच्या पत्नींसह बोलावून घेऊन त्यांना जन्मभर पुरेल एवढा आनंद वसंतरावांनी मिळवून दिला. राजकारणात अभावानेच आढळणारे निर्वैरपण त्यांना नेहमी जपता आले. भटक्या व विमुक्त समाजात जन्मलेल्या आणि नागपुरातील घाटे या प्रतिष्ठित ब्राम्हण कुटुंबातून आलेल्या वत्सलाबाईंशी प्रेमविवाह केलेल्या वसंतरावांच्या मनाला जातीयताही कधी शिवली नाही. माणसे कशाकशाने फुलून आणि फुगून जाताना पाहावी लागण्याच्या आजच्या काळात ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद अनुभवणाऱ्या या नंत्याला अहंकार वा गर्व सोडा, पण त्याच्या साध्या अभिमानाचा दर्प चढल्याचेही कधी आढळले नाही. त्याहून महत्त्वाची बाब ही की एवढी वर्षे सत्ता हातात ठेवणाऱ्या वसंतरावांवर कोणाला कधी तिचा गैरवापर केल्याचा आरोप ठेवता आला नाही.

साऱ्यात राहून साऱ्याहून वेगळे राहता येणे, राजकारणात असतानाही राजकारणी न होणे आणि पदावर असतानाही जमीन व जमाना यांच्याशी नाते राखता येणे हीच आजच्या काळात किमया वाटावी अशी बाब आहे. महाराष्ट्राच्या एवढ्या वर्षांच्या राजकारणात एकट्या वसंतराव नाईकांनाच ती जमली असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

मात्र वसंतरावांनी राजकारणाला स्वतःपासून दूर ठेवण्यात आपल्या सहज साध्या प्रकृतीधर्माच्या बळावर यश मिळविले असले तरी राजकारणाने त्यांना तसे नेहमीच राहू दिले नाही. ते यशवंतरावांचे विश्वासू सहकारी व स्नेही होते आणि त्यांना नसले तरी यशवंतरावांना जाचाचे ठरेल असे राजकारण करणारे लोक फार होते. ते दिल्लीत होते तसे मुंबईत होते आणि पुण्यात होते तसे नागपूर - विदर्भातही होते. यशवंतरावांचे पंख व पाय कापण्याचे राजकारण करणाऱ्या दिल्ली व मुंबईतील लोकांना वसंतरावांची त्यांच्यावरील निष्ठा सलणारीही होती. त्या माणसांनी प्रथच त्या दोघांत वितुष्ट आणण्याचा प्रयत्न करुन पाहिला. निदान त्यांनी यशवंतरावांचे राजकारण चालविणे थांबवावे अशी गळ त्यांना घालून पाहिली. दिल्लीकर यात पुढे होते आणि यशवंतरावांच्या पाठिंब्यासाठी स्पर्धा करणारी मुंबईतील माणसेही त्यात मागे नव्हती. पण वसंतराव त्यांच्या राजकारणाला कधी बधले नाहीत.

१९६९ मध्ये काँग्रेस पक्षाच्या झालेल्या दुभंगाच्या काळात त्यांनी इंदिरा गांधिंचा पक्ष न घेता यशवंतरावांची बाजू घेतली. नंतरच्या इंदिरा व यशवंत यांच्यातील

जवळिकीच्या काळातही ते यशवंतरावांच्या जवळ आणि इंदिरा गांधींपासून एक अंतर राखून राहिले. हा काळ इंदिरा गांधींचा दुरावा व रोष ओढवून घेणारा आणि त्यांची अस्वस्थता वाढविणारा होता. त्या दुराव्यचे कारण वसंतराव नव्हते, यशवंतराव होते. यशवंतरावांचे मराठी राजकारणातील स्थान जोवर भक्कम आहे तोवर दिल्लीकरांना त्यात फारशी ढवळाढवळ करता येत नव्हती. ते स्थान उखडयचे तर वसंतरावांना त्यांच्यपासून दूर करणे गरजेचे होते. वसंतदादा आणि शंकररावांना ते करणे जमले आणि पवारांनी स्वतःच त्यांचा मार्ग वेगळा केला. वसंतरावांनी मात्र यशवंतरावांची साथ अखेरपर्यंत सोडली नाही. परिणामी यशवंतरावांच्या राजकारणाची जी परवड त्यांच्या शेवटच्या काळात झाली तशीच ती वसंतरावांच्याही वाट्याला त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात आली. दिल्लीच्या काँग्रेस नेतृत्वाने त्यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार होण्याचा आदेश ज्या तऱ्हेने दिला तो त्यांच्या तोवरच्या सेवेची कदर करणारा नव्हता. ज्यांचा आधार होता ते यशवंतराव स्वतः निराधार झाले होते आणि ते पायउतार होणार म्हणून उतावीळ झालेले महाराष्ट्रातील मराठा नेतृत्व त्यांची उपेक्षा करायला सज्ज होते. अखेरच्या काळात कॉंग्रेस पक्षाने वसंतरावांना लोकसभेचे तिकीट दिले. ते प्रचंड बहुमताने निवडूनही आले. पण महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे मुख्यमंत्रीपद तब्बल ११ वर्षे भूषविलेला हा नेता दिल्लीत साधा खासदारच राहिला. आपली व आपल्या मान्यवर नेत्याची दिल्लीत होणारी परवड पाहात व मुंबईत होणारी

उपेक्षा सहन करीतच त्यांनी हा काळ काढला. अखेर त्याच स्थितीत सिंगापूरला असताना ह्दयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

वसंतरावांनी त्यांच्या आयुष्यातच मिळविलेले यश मोठे होते. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहुली या खेडयात एका भटक्या जातीत जन्माला आलेला मुलगा, त्याची बुध्दी, परिश्रम व निष्ठा यांच्या बळावर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, त्या पदावर तीन वेळा निवड होण्याचा त्याचा मान त्याच्याअगोदर व नंतर कोणाला मिळत नसतो, साऱ्या महाराष्ट्राला आपलेसे करण्याएवढे त्याचे नेतृत्व सर्वगामी व सर्वव्यापी होते, त्याने राज्याला सुरू केलेल्या अनेक योजना राष्ट्रपातळीवर स्वीकारल्या जातात आणि खेड्यातल्या माणसांएवढाच शहरातल्या कामगारांचा आणि गरिब आदिवासींएवढाच तो शहरी मध्यमवर्गीयांना आणि धनवंतांनाही आपला वाटू लागतो. तो शेतकऱ्यांचा पुढारी असतो आणि शहरी माणसांच्याही विश्वासाचा विषय होतो. त्याला समाजकारणात मान्यता मिळते, सांस्कृतिक क्षेत्रात लौकिक प्राप्त होतो आणि त्याचा चाहता वर्ग सर्वक्षेत्रीय असतो... याहून त्याचे मोठे यश राजकारणात राहूनही निर्वैर असण्यात असते. त्याला सर्वच पक्षातून मित्र मिळतात. त्याचे कौतुक एसेम जोशांना असते आणि सेनेच्या ठाकऱ्यांनाही त्याच्याविषयी आपलेपण वाटते. शेकापच्या कृष्णराव धुळुपांशी त्याचे मैत्र असते आणि डॉ. डांग्यांनाही त्याच्याशी आत्मीयतेचे संबंध ठेवावेसे वाटतात. तो काँग्रेसला आपला वाटतो आणि विरोधकांनाही वैरी वाटत नाही... याहूनही

त्याचे मोठे यश एवढी वर्षे राजकारणात राहून आपले चारित्र्य निष्कलंक ठेवण्यातले असते. साऱ्या राजकीय हयातीत त्यांना चिकटू शकेल असा ठपका विरोधी पक्षांना, मध्यमांना किंवा कोणा खुसपटखोराला त्यांच्यावर ठेवता आला नाही. राजकारणात जाताना ते जेवढे साधे आणि स्वच्छच राहिले. मधल्या काळाने त्यांना दिलेच असेल एक प्रगल्भ विनम्रपणा, हसतमुख माणूसपण, नेता असतानाचे अनुयायीपण आणि अनेकांमध्ये एकमेव असतानाही एकमेव न होता अनेकातला एक राहण्याचे निर्वीपण. वसंतराव रसिक होत. त्यांना गाणे आवडायचे. चांगल्या सामिष भोजनाचा चविने आस्वाद घेणे त्यांना सगळ्या धकाधकीत जमायचे. त्यांना आवडणारे आणि आताच्या गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचालाच मिळू शकणारे मासे मुंबईत बोलवून घेणे व ते आपल्या स्नेह्यांना खिलविणे यात त्यांना रस होता. त्यांच्या स्वभावात मैफलीपण होते. हसरे संवाद मनमुरादपणे अनुभवणे हा त्यांच्या विरंगुळ्याचा भाग. चांगली माणसे कलावंत, मूर्तिकार, चित्रकर आणि साहित्थिक यांच्या संपर्काची त्यांना ओढ होती, त्यांना ते सतत प्रोत्साहन देत आणि त्या कौतुकात साधे कोरडेपण नसे, त्याला मदतीची जोड असे.

वसंतरावांचे घराणे श्रीमंत होते. सासुरवाडीही धनवंत होती. मात्र त्यांच्या वागण्या बोलण्यात पुढाऱ्याचे सुस्तावलेले सैलपण नवह्ते. नेतेपदावर असतानाही त्याच्या व्यक्तिमत्त्वातला प्रशासकच नेहमी प्रभावी दिसायचा. त्यांचा पोषाश, तोंडात पाईप धरण्याची त्यांची ऐट, बोलण्यातली

अधिकाराची जाण आणि हसरी असली तरी डोळ्यातली तीक्ष्ण जरब थेट करडी आणि लष्करी होती. मुंबईत वावरतानाही त्यांच्यातले 'गहुलीपण' कायम होते. कष्टातून वर आळेल्या समाजातील तरुणांमध्ये दिसणारे त्यांचे ताठपण नंतरच्या सुखासीन आयुष्यातही तसेच होते. त्यामुळे जवळच्यांनाही ते दूरस्थ वाटत आणि त्यांच्या मनात त्यांच्याविषयी एक जरबही असे. 'मी त्यांना सांगून आलो आहे' किंवा ' मी सांगतो तसे ते करणारच' असे त्यांना गृहीत धरुन कोणाला बोलता येत नसे.

वसंतरावांनी महाराष्ट्राची धुरा सांभावली तेव्हा ते तुटीचे राज्य होते, अन्नधान्यांच्या संकटात होते आणि दुष्काळाच्या सावटात होते. मुंबईत असंतोष आणि कामगारांत चळवळ होती. विदर्भात असमाधान आणि मराठवाड्यात विकासाच्या अनुशेषावरुन उठलेले वादळ होते. पश्चिम महाराष्ट्राला 'हा' मुख्यमंत्री आपल्यावर लादलेला वाटला तर कोकण प्रदेशाला त्याचे दूरचे असणे खटकणारे होते. वसंतरावांनी मुख्यमंत्री पद सोडले तेव्हा राज्याची तूट भरुन निघाली होती. अन्नधान्यात स्वयंपूर्णता आली होती. मुंबईला असंतोष आणि विदर्भातले असमाधान शमले होते, मराठवाड्याच्या अनुशेषावर मात करण्यात यश आले होते आणि कोकणचा त्यांच्याविषयीचा दूरावा मिटला होता... जबाबदारी घेतानाचा व ती सोडतानाचा काळ यातला फरकच नेत्याचे यशापयश निश्चित करीत असतो. त्या गणिताने वसंतरावांचे यश पूर्ण नसले तरी मोठे व

अभिनंदनीय होते आणि त्या त्यांना व महाराष्ट्राला समाधान होते. यशवंतरावांवर त्यांच्या कारकीर्दीच्या आरंभी झाली तशी विषारी टीका त्यांच्यावर झाली नाही आणि कन्नमवारांच्या वाटयाला आलेला अडाणी उपहासही त्यांना सहन करावा लागला नाही. सन्मानपूर्वक स्वीकारलेले मुख्यमंत्रीपद त्यांनी जनतेतला आपला आदर कायम राखूनच नंतरच्या नेत्याकडे सोपविलेले साऱ्यांना दिसले.

राजीनामा नंतर दि. १२.०३.१९७७ साली वसंतराव नाईक यांनी वाशिम मतदार संघातून खासदार लोकसभेत निवडून गेले. वसंतराव नाईक केंद्रात जावूनही जनतेला विश्वासात घेऊन विविध विकासकामे पार पाडली. डोंगर कपारी व रानोमाळ भटकणाऱ्या बंजारा समाजाला आधुनिक जागाची ओळख करून दिली. समाज जागृतीचा पहिला अध्याय त्यांनी समाजाला दिला. त्यांचे हे विचार बंजारा समाजापुरते मर्यादीत न राहता प्रत्येक जाती-धर्म, विविध समाजात पोंहचले आणि प्रत्येक ठिकाणी एक माणूस म्हणून यावे हीच त्यांची इच्छा होती. दि. १८.०८.१९७९ रोजी वसंतरावजी नाईक व सौ. वत्सलाबाई नाईक यांच्या उभयतांनीच सिंगापूर यात्रा करीत असताना वसंतरावजी नाईक यांचे ६६ व्या वर्षी निधन झाले.

असा नेता महाराष्ट्राच्या अध्वर्युपदावर एवढी वर्षे राहिला आणि त्याच्या वर्तमान व भविष्याची वाट त्याने प्रशस्त केली यासाठी त्याला अभिवादन!

## “थोडक्यात सारांश”

सध्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्यानावावरून वाद सुरू आहे. जी नाव समोर आली आहेत त्या नावाला घेऊन आमचा विरोध नाही तर आश्चर्य होत आहे की नवी मुंबई मधील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावाची चर्चा होत असताना नवी मुंबई चे जनक, हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक क्रांतीचे जनक, शेतकऱ्यांचे कैवारी, विकासाचे महानायक, महाराष्ट्र राज्याचे सलग सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पद भूषविणारे मा. वसंतराव नाईक साहेब यांचा साधा उल्लेख सुद्धा कुठल्याही पक्षाने व नेत्यांने केला नाही.

थोर समाजसुधारक, संत, क्रांतिकारी, महान योद्धा व समाजातील पूजनीय व आदरणीय लोकांचे नाव देशातील विविध संस्था, इमारती, प्रेक्षणीय स्थळे, रस्ते उड्डाण पूल, यांना देण्याची परंपरा सगळीकडे प्रचलित आहे. त्या दृष्टीने मोठ्या आणि महान लोकांना मान सन्मान आदर देण्याची ही पद्धत व प्रथा आहे.

या महान प्रथा आणि परंपरा यांचा जातीचा दाखला लागतो का ?? की महान लोक फक्त विशेष जाती व

समुदायातून जन्माला येतात ?? की दूसऱ्या जातीतील महान व प्रतापगड लोकांना फक्त निवडणुकीसाठी वापरले जातात ?? फक्त त्या उच्च व महान माणसाच्या समाजातील एखाद्याला आमदारकी किंवा विधान परिषदेत जागा देऊन त्यांचं कर्तृत्व जयंती व पुण्यतिथी वर फोटो टाकण्या पर्यंत, मर्यादित करण्यात येते का ?? समता, बंधुता, न्याय ह्या गोष्टी फक्त भाषण व पुस्तका पर्यंत सीमित आहेत का?

हातात कोयता, खांद्यावर नागर, डोक्यावर गवताचा भारा घेऊन इट दगडाचा आपल्या पायाने भुगा करणाऱ्या कणखर जातीच्या, कुशल नेतृत्वाच्या अंधार कोठडी का ?? आपल्या कर्तुत्वाने, कार्याने, आपल्या दूरदृष्टी पणाने महाराष्ट्राला प्रगतीच्या उत्तुंग शिखरावर पोहोचण्याच कार्य वसंतराव नाईक साहेबांनी केले. 1960 1963 नवनिर्मित महाराष्ट्राची पायाभरणी झाली न झाली तोच महाराष्ट्र उभारण्याची संपूर्ण जबाबदारी मा. यशवंतराव चव्हाण साहेबांनंतर वसंतराव नाईक यांच्या खांद्यावर येऊन पडली. यशवंतराव चव्हाणयांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळाली होती.महाराष्ट्रात सततचा पडणारा दुष्काळ, पाणी व अन्नधान्याची कमतरता यामुळे महाराष्ट्रातील जनता होरपळून जायची हे दुःख साहेबांना सहन होत नव्हते. अशा

परिस्थितीत 3 डिसेंबर 1965 शनिवार वाडा पुणे येथे भरसभेत नाईक साहेबांनी एक प्रतिज्ञा केली येणाऱ्या दोन वर्षात जर मी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले नाही तर मला जाहीरपणे फासावर चढवा या प्रतिज्ञेने महाराष्ट्रच नाही तर दिल्ली सुद्धा हलली. फक्त घोषणा करून साहेब शांत बसले नाही तर महाराष्ट्रातील सर्व मुख्य जिल्ह्याचे दौरे करून शेतकऱ्यांमध्ये नवीन ऊर्जेचा संचार केला.

नाईक साहेबांना ज्ञात होत की शेती हा भारताचा सर्वात मोठा उद्योग आहे त्यामुळेच महाराष्ट्राच्या शेतीमध्ये साहेबांनी अमोल प्रयोग करून कृषी विद्यापीठे स्थापन केली व बदल घडवून आणले. पहिले कृषी विद्यापीठ राहुरी अहमदनगर येथे उभारण्यात आले नंतर अकोला, परभणी, दापोली येथे बाकीची विद्यापीठे उभारण्यात आली तर सोबतच महाराष्ट्र राज्य बियाणे मंडळाची स्थापना करण्यात आली. फलस्वरूप महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. उत्तम अभ्यासक व दूरदृष्टी पणा असणारे नाईक साहेब व त्यांचे कार्य यांचे उदाहरणदिलेत तेवढे कमी पडतील.नवी मुंबई ची निर्मिती, सिडको, मुंबईतील

झोपडपट्टी पुनर्वसन, नवीन औरंगाबाद, म्हशीच्या खाडीच्या पुलची निर्मिती, जायकवाडी प्रकल्प, उजनी धरण, ढोम धरण, अप्पर वर्धा, पारस औद्योगिक विद्युत केंद्र, कापरखेडा विद्युत केंद्र, कोराडी विद्युत केंद्र, परळी विद्युत केंद्र, भुसावळ विद्युत केंद्र अशी ही यादी नाईक साहेबांन प्रमाणेच मोठी आहे.

असून सुद्धा नाईक साहेब यांच्या स्मरणार्थ भरीव, अर्थपूर्ण व ऐतिहासिक असे कुठलेच कार्य आजपर्यंत झालेले नाही. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष अंतर्गत घोषित केलेल्या अनेक बाबी आज ही शासनाच्या दारी फाईल मध्ये गप्प बसवण्यात उत्पन्न आणि धूळ खात आहे. साहेबांनी केलेल्या कार्याची दखल एक ही पक्ष, एकही नेता आपल्या चतुर व राजकीय डोक्यात घेत नाही हे पचण्यासारखं नाही. समाजकारणाचा सोबत नीतीमय राजकारणात ही नाईक साहेब तरबेज होते. 1960 च्या काळातकाँग्रेसला मुंबईमध्ये कम्युनिस्ट पक्षाची वाढती ताकद जोर दाखवत होती. मुख्यतः कम्युनिस्ट पक्षाला असलेला गिरणी कामगार व इतर मजूर संघाचा अत्यंत प्रभावी पाठिंबा व समर्थन यामागील मुख्य कारण होतं याच काळात 1966 मध्ये बाळासाहेबांनी मराठी अस्मिता टिकवण्यासाठी व मुंबईत दाक्षीण्यात

लोकांच्या वाढत्या प्रभावाचा विरोधात शिवसेना या पक्षाची निर्मिती केली. व दुसऱ्या बाजूला मुंबईमध्ये जॉर्ज फर्नांडिस नावाच एक नेतृत्व जोरदार मुसंडी मारत होत. समाजवादी व्यापारी संघटनेच्या चळवळीचे ते नेते होते. 1967 च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांनी सलग तीनदा खासदार म्हणून निवडून आलेले काँग्रेसचे बलाढ्य नेता सदाशिव कानोजी पाटील यांचा पराभव केला. हा पराभव काँग्रेसच्या पचनी पडणारा नव्हता व खास करून त्यावेळी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेतृत्वाची धुरा वसंतराव नाईक यांच्याकडे होती. याच बाबीचा सखोल विचार करून आपल्या चाणक्य नितिचा वापर करत आपल्या काँग्रेस पक्षाला मजबुती देण्यासाठी मा.  वसंतराव नाईक साहेबांनी शिवसेनाच्या दाक्षिण्यात लोकांच्या विरोधी भूमिकेला सौम्यपणे हाताळून अप्रत्यक्षपणे शिवसेनाला बळकटी दिली व परिणाम स्वरूप कम्युनिस्ट पक्ष मुंबईमध्ये कमजोर पडत गेला. त्याची प्रचीती म्हणून 1971 मध्ये  दक्षिण बॉम्बे (मुंबई) ची जागा परत काँग्रेसने जिंकली. नाईक साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर 'मार्मिक' मधून ' महाराष्ट्र हे आदर्श राज्य करून दाखवू, अशी इच्छा बाळगणारे मुख्यमंत्री आपल्याला लाभले आहेत ', असं कौतुकाच्या शब्दांनी त्यांचं स्वागत बाळासाहेबांनी केलं

होतं. शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर मुंबईतील कम्युनिस्टांचे वर्चस्व हटवण्यासाठी काँग्रेस शिवसेनेला मदत करते, असा आरोप होत राहिला. शिवसेनेला ' वसंतसेना ' म्हणेपर्यंत ही टीका व्हायची.

शेतकऱ्याला त्याचा हक्क मिळायला पाहिजे तो मान सन्मानाने जगला पाहिजे यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या नाईक साहेबांनी कापूस एकाधिकार योजना अमलात आणली. तसेच धवल क्रांती योजना, पाणी आडवा पाणी जिरवा, औद्योगिक विद्युतीकरण याचा पाया साहेबांनी रचला. अशीच आणखी एक योजना साहेबांनी राबवली ती म्हणजे रोजगार हमी योजना, जी एवढी लोकप्रिय झाली की 2004 मध्ये केंद्र सरकारने त्याचा अवलंब केला व आज ही योजना संपूर्ण देशात मनरेगा या नावांनी राबविल्या जाते.

ग्रामीण भागाचा उत्तम आपल्यात असल्यामुळे स्थानिक लोकांना सरकारच्या कामात सामील करावे आणि जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थानिक लोकांनी निवडून दिलेला असावा असे ठाम मत असणाऱ्या वसंतराव नाईक यांच्या नाईक समितीच्या शिफारशीनुसार जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीची निर्मिती झाली. राजकारणात सुसंस्कृत राजकारण कसे करावे याचा आदर्श

म्हणजे नाईक साहेब. शेती, जलसंधारण, औद्योगीक क्षेत्रासह सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा साहेबांचं कार्य महत्त्वपूर्ण आहे जसे मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याचे महान कार्य नाईक साहेबांनी शकेल तसेच एकदा 1962 मध्ये बाळ कोल्हटकर यांच्या ' सीमेवरून परत जा' हे नाटक बघत असताना जेव्हा interval मध्ये बाळ कोल्हटकरनी साहेबानं समोर 30% लागणाऱ्या tax ची सुविधा मांडली तेव्हा लगेच साहेबांनी tax माफी ची घोषणा केली व त्यानंतर महाराष्ट्रात आज कोणत्याही नाटकाला tax भरावा लागत नाही. अशा सुसंस्कृत नेत्याला आपल्या विचारातून मुद्दामून बघणे आता सत्तेत व विरोधात असलेल्या नेत्यांना शोभते का ??छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा फुले व महामानव डॉक्टर बाबासाहेबांचं कार्यक्रम घेऊन माळ टाकायची व त्यानंतर त्याच माळेने बहुजनांच्याकर्तबगार व श्रेष्ठ माणसाचा गळा कापायचा. हे उचित आहे का ??

भूदान चळवळीत विनोबा भावे सोबत सक्रिय सहभाग घेऊन लाखो भूमिहीन मजुरांना शेती मिळवून देण्याचे महान कार्य असेल अथवा Land reform आणि कुल कायद्याच्या मदतीने लाखो भूमिहीन शेतकऱ्यांना शेती

मिळवून देण्याचं काम चोखपणे केलं. शेतीसोबत शेतकरी निर्माण करण्याचं कार्य नाईक साहेबांनी केलं.

अशा संपूर्ण कार यांनी व आपल्या कर्तुत्वाने संपूर्ण महाराष्ट्राला दिशा देणारे व महाराष्ट्राच्या प्रगतीपथाचा रथ निर्माण करणारे, उच्चविद्याविभूषित वसंतराव नाईक यांचा विसर का ?? आज सत्तेत असलेले राष्ट्रवादी पार्टीचे संस्थापक मा. शरद चंद्र पवार साहेब यांची कुशलता व राजकीय गुणवत्ता, नाईक साहेबांनी ओळखून 1972 मध्ये राज्यमंत्री तर 1974 मध्ये शिक्षण मंत्री म्हणून आपल्या कॅबिनेटमध्ये त्यांची वर्णी लावली. आज शरद पवार साहेबराजकारणातले अमर नेते आहेत.अशा तमाम राजकीय, अराजकीय व सामाजिक लोकांचं यशस्वी नेतृत्व करणाऱ्या वसंतराव नाईक साहेबांचा सन्मान म्हणून त्याचं नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देऊळ या महापुरुषाला खरी आदरांजली देण्याचं काम काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या आघाडी सरकारन कराव.

## संदर्भ सूची:-


1) भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था व समस्त बंजारा सामाजिक संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत विचार व्याख्यानमाला 2021
2) मा. श्री. मोहन राठोड, पुणे ज्येष्ठ पत्रकार व जनसंपर्क विभाग, पुणे
3) मा. श्री. दीपक आसेगावकर, पुसद, अध्यक्ष वसंतराव नाईक प्रतिष्ठान मानव सेवा समिती, पुसद
4) मा. श्री. प्रा. डॉ. रमेश काशीदे पुणे, अर्थशास्त्र अभ्यासक
5) मा. श्री. ॲड. सुरेश माने, मुंबई संविधान तज्ञ.
6) मा. डॉ. संदीप राठोड आय.ऐ.एस. व्यवस्थापकीय संचालक एच. बी. सी. एल., मुंबई
7) मा. डॉ. व्यंकटराव मायंदे, पुणे माजी कुलगुरू डॉ पं. दे. कृषी विद्यापीठ, अकोला
8) मा. निलय नाईक, पुसद विधान परिषद सदस्य
9) मा. श्री. अरुण खोरे, पुणे ज्येष्ठ पत्रकार व संपादक
10) मा. श्री. निशा मुंडे- पवार विभाग प्रमुख, पत्रकारिता विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
11) मा. श्री. दिगंबर राठोड माजलगाव, संस्थापक बी. बी.
12) एस. के. एस. एस. माजलगाव.